**MHRG060010262017**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १६/१२/२०१७ |
| नोंदणी तारीख | : | १६/१२/२०१७ |
| निकाल तारीख | : | १९/१२/२०२२ |
| कालावधी | : | **वर्षे महिने दिवस** |
| | | ०५ ०० ०३ |

**पेण येथील सह. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात.**

(पीठासीन अधिकारी – प्रितेश देशपांडे )

सीएनआर : एमएचआरजी ०६–००१०२६–२०१७
नियमित दिवाणी दावा क्रमांक ११६/२०१७
निशाणी क्रमांक ४०/ब

१. श्री. जनार्दन नागु ठाकुर )
वयः ६८ वर्षे, व्यवसायः शेती व निवृत्त, )
रा. पांडापुर, पो. कासु, )
ता. पेण, जि. रायगड. ) ... **वादी**

विरुध्द

१. श्री. खंडु नागु ठाकुर )
वयः ६२ वर्षे, व्यवसायः शेती )
रा. शांतीनगर अपपार्टमेंट, पी–६, )
बिल्डींग नं. १२, रुम नं. १५, )
नविन पनवेल, सेक्टर १५, नवी मुंबई ४१० २०६ )

२. श्रीमती पुष्पा कृष्णा ठाकुर )
वयः ५० वर्षे, व्यवसायः गृहिणी )
रा. पांडापुर, पो. कासु, )
ता. पेण, जि. रायगड. )

३. श्री. भास्कर कृष्णा ठाकुर )
वयः २२ वर्षे, व्यवसायः शेती )
रा. पांडापुर, पो. कासु, )
ता. पेण, जि. रायगड. )
४. सौ भारती वसंत डोलकर )
पुवाश्रमीची भारती कृष्णा ठाकुर )
वयः २८ वर्षे, व्यवसायः गृहिणी )
रा. खारआपटी, ता. रोहा, जि. रायगड. )
५. सौ. हेमा ज्ञानेश्वर म्हात्रे )
पुर्वाश्रमीची हेमा कृष्णा ठाकूर )
वयः २६ वर्षे, व्यवसायः गृहिणी )
रा. कालई, पो. आमटेम, )
ता. पेण, जि. रायगड )
६. सौ. कांता भुषण म्हात्रे )
पुर्वाश्रमीची कांता कृष्णा ठाकुर )
वयः २५ वर्षे, व्यवसायः गृहिणी )
रा. पालखार, पो. आमटेम, )
ता. पेण, जि. रायगड )
७. सौ. संजना सचिन पाटील )
पुर्वाश्रमीची संजना कृष्णा ठाकुर )
वयः २३ वर्षे, व्यवसायः गृहिणी )
रा. पांडापुर, पो. कासु, )
ता. पेण, जि. रायगड )
८. श्रीमती विठाबाई विनायक नाईक )
वयः ६५ वर्षे, व्यवसायः गृहिणी )
रा. ई-३०३, तुळशी आर्केड, )
भगवती हॉस्पीटल समोर, )
रमेशवाडी, कुळगाव, बदलापुर, पश्चिम. ) ... **प्रतिवादी**

**<u>दावा</u> – <u>ठरावाकरीता व वाटपाकरीता.</u>**

**विधीज्ञ :**

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे विव्दान विधिज्ञ | : | श्री. पी. डी. मोकल |
| प्रतिवादी क्र. १ व ८ तर्फे विव्दान विधिज्ञ | : | श्री. एस. एस. कटके |
| प्रतिवादी क्र. २ ते ७ तर्फे विव्दान विधिज्ञ | : | श्री. व्ही. सी. ठाकूर |

## : न्यायनिर्णय :

(घोषीत दिनांक १९ डिसेंबर २०२२ रोजी)

वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता व ठरावाकरीता दाखल केला आहे.

**वादीचे कथन संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे आहे –**

०२. मौजे पाटणी पांडापूर, ता. पेण, जि. रायगड येथील स.नं. ५८, हिस्सा नं. १ व स.नं. ७१/२ब, हिस्सा क्र. १ तसेच मौजे निगडे येथील स.नं. ५७, हिस्सा क्र. १ त्याचप्रमाणे ग्रामपंचायत घर क्र. ७१५अ व ७२३अ असे दाव्याच्या परिच्छेद क्र. १ अ व १ ब मध्ये विस्तृतपणे वर्णन केलेली मिळकत हा दाव्याचा विषय असून सदर मिळकतीस यापुढे वादमिळकत असे संबोधलेले आहे.

०३. वादी यांच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी यांच्या कुटूंबाचे मुळ पुरुष नागु सोमा ठाकुर होते. त्यांना वादी, प्रतिवादी क्र. १, मयत कृष्णा ठाकुर व प्रतिवादी क्र. ८ अशी अपत्ये होती. प्रतिवादी क्र. २ ते ७ हे मयत कृष्णा ठाकूर यांचे वारस आहेत. नागु सोमा ठाकुर हे दि. १२.०७.१९८६ रोजी मयत झाले. मौजे निगडे येथील स.नं. ५८ हि मिळकत हरिश्चंद्र ठाकुर यांच्या मालकीची असल्याने ती

दाव्यामध्ये समाविष्ठ केलेली नाही. वादमिळकत नागु सोमा ठाकुर यांच्या मालकीची होती. वादमिळकत 'ब' म्हणजेच ग्रामपंचायत हद्दीतील घरे यावर आजही नागु यांचेच नाव महसूल सदरी आहे. वादमिळकत ग्रामपंचायत घर क्र. ७२३अ यामध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ राहतात तर, घर क्र. ७१५अ मध्ये कोणीही राहत नाहीत. वादी व प्रतिवादी वेगवेगळे राहतात. मात्र त्यांच्यात आजतागायत सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. कै. नागु यांनी वादमिळकतीचे कोणतेही मृत्यपत्र अथवा व्यवस्थापन पत्र केलेले नाही. वादमिळकत स.नं. ५८/१ ही प्रतिवादी क्र. २ व ३ कसत असून वादमिळकत स.नं. ७१/२ब/१ ही खारे पाणी घुसल्याने पडजमिन आहे. वादीला वादमिकतीचे वाटप करुन स्वतःचा विभक्त हिस्सा हवा आहे. वादी यांनी प्रतिवादी यांना दि. १३.११.२०१७ रोजी नोटीस दिली. मात्र प्रतिवादी यांनी त्यास उत्तर दिले नाही अथवा कोणताही प्रतिसाद दिला नाही. दाव्यास त्यामुळे कारण उद्भवले आहे. सबब, प्रस्तुत दाव्याव्दारे वादी वादमिळकतीचे वाटप मागून सरस–निरस मानाने त्यांचा हिस्सा विभक्त करुन मागत आहेत.

०४. प्रतिवादीस दाव्याचे समन्स प्राप्त होवून ते दाव्यामध्ये हजर झाले. प्रतिवादी क्र. १ यांनी नि.क्र. १४ वर त्यांची कैफियत दाखल करुन दावा मान्य केला आहे.

०५. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी नि.क्र. १६ वर त्यांची कैफियत दाखल करुन दावा नाकारलेला आहे. सदर प्रतिवादी यांच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी यांचेमध्ये याआधीच तोंडी वाटप झालेले असून घर क्र. ७२३अ हे मयत कृष्णा

यांच्या वाटयाला आले व ते गेले ४५ ते ५० वर्षांपासून तेथे राहत आहेत. वादी मयत कृष्णा, प्रतिवादी क्र. १, प्रतिवादी क्र. ८ यांच्यामध्ये नागु ठाकुर यांच्या हयातीतच एप्रिल १९९२ मध्ये तोंडी वाटप झाले होते. त्याव्दारे मयत कृष्णा यांच्या वाटयाला स.नं. ५८/१ मधील वादमिळकत आली होती. त्याव्दारे मयत कृष्णा सदर मिळकत कसत होते. कृष्णा ठाकुर दि. २४.०२.२००२ रोजी मयत झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र. २ ते ७ सदर मिळकत कसत आहेत. ग्रामपंचायत घर क्र. ७२३अ मयत कृष्णा यांच्या वाटयाला आली होती. त्यांचयाशिवाय इतरांचा सदर वादमिळकतीमध्ये हक्क नाही. सन १९९२ पासून वादी व प्रतिवादी वेगवेगळे राहत असून त्यांच्यामध्ये वाटप झाले आहे. केवळ त्याच्या नोंदी महसूल सदरी झालेल्या नाहीत. वाटपादरम्यान वादी यांना वादमिळकत स.नं. ७१/२ब/१ व ग्रामपंचायत घर क्र. ७१५अ ही मिळाले असून वादी हे पुर्वी पोलीस खात्यात कार्यरत होते व आता सेवानिवृत्त झालेले आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांना मौजे निगडे येथील स.नं. ५७/१ व स.नं. ५८ पैकी २३.६५ गुंठे जमिन वाटपामध्ये मिळाली आहे. प्रतिवादी क्र. १ हे पनवेल येथील कंपनीमध्ये उच्चपदावर कार्यरत असल्याने त्यांनी वादमिळकतीतील हिस्सा सोडून दिला आहे. प्रतिवादी क्र. ८ यांनी लग्नावेळीच वादमिळकतीमधील हिस्सा सोडून दिला आहे. सदर प्रतिवादी वादमिळकत सन १९९२ सालापासून कसत आहेत. मयत नागु यांची पत्नी नागीबाई हिचे सोन्याचे दागिने वादी तसेच प्रतिवादी क्र. १ यांच्याकडे आहेत. ते दाव्यामध्ये समाविष्ठ केलेले नाहीत. सबब, सर्व मिळकत दाव्यामध्ये समाविष्ठ न करण्याची दाव्यास बाधा आहे. सबब, त्यांनी दावा खारीज करण्याची विनंती करुन त्यांनी दाखल केलेला ठरावाचा प्रतिदावा मान्य करण्याची विनंती केली.

०६. प्रतिवादी क्र. ८ यांनी नि.क्र. ३९ वर पुरशीस देवून प्रतिवादी क्र. १ यांनी दिलेली कैफित स्वीकारली व दावा मान्य केला.

०७. माझे विव्दान पूर्वाधिकारी यांनी निशाणी क्रमांक २२ वर मुद्दे निश्चित केले. त्याप्रमाणे माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले असून यापुढे नमुद केलेल्या कारणास्तव या मुद्दयांसमोर मी माझे निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादमिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत एकत्रीत कुटूंबाची मिळकत असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| २. | वादी यांना वादमिळकतीमध्ये हिस्सा असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| ३. | होय असल्यास वादी व प्रतिवादी यांचे अनुक्रमे हिस्से किती ? | वादी, प्रतिवादी क्र. १ व ८ यांना प्रत्येकी १/४ हिस्सा तर प्रतिवादी क्र. २ ते ७ यांना प्रत्येकी १/२४ हिस्सा |
| ४. | वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे ठरावाच्या व वाटपाच्या मागणीस पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ५. | वादी दाव्याचा खर्च मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ६. | काय हुकुमनामा व आदेश ? | अंतिम हुकूमाप्रमाणे |

**मान्य केलेली कथने –**

०८. वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंध, नागु ठाकुर हे त्यांच्या कुटूंबाचे मुळ पुरुष असल्याची बाब, वादमिळकत वडिलोपार्जीत मिळकत असल्याची बाब ही कथने मान्य केलेली कथने आहेत.

**वादी व प्रतिवादी यांचा पुरावा –**

०९. वादी जनार्दन ठाकुर यांनी आपल्या कथनाच्या पृष्ठयर्थ त्यांची साक्ष नि.क्र. २३ कडे नोंदविली. त्याचप्रमाणे वादी खालील कागदोपत्री पुराव्यावर विसंबून राहीला.

| अ.क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | दि. ०१.०८.२०१७ रोजीचा वादमिळकत स.नं. ५८/१ चा सातबारा उतारा | २४ |
| २. | दि. ०१.०८.२०१७ रोजीचा वादमिळकत स.नं. ७१/२/ब/१ चा सातबारा उतारा | २५ |
| ३. | घर नं. ७१५अ व ७२३अ चा असेसमेंट उतारा | २७ |
| ४. | फेरफार क्र. १९६७ व २२७० | २८ |
| ५. | दि. १३.११.२०१७ रोजी वादी यांनी पाठविलेली नोटीस | २९ |
| ६. | नोटीस मिळाल्याच्या पोहोच पावत्या | ३० |

१०. वादीतर्फे सा.क्र. १ म्हणून साक्ष देताना वादी यांनी असे कथन केले की, ते व प्रतिवादी यांच्या कुटूंबाचे मुळ पुरुष नागू सोमा ठाकुर होते. त्यांना ते,

प्रतिवादी क्र. १, मयत कृष्णा ठाकुर व प्रतिवादी क्र. ८ अशी अपत्ये होती. प्रतिवादी क्र. २ ते ७ हे मयत कृष्णा ठाकूर यांचे वारस आहेत. नागु सोमा ठाकुर हे दि. १२.०७.१९८६ रोजी मयत झाले. वादमिळकत नागु सोमा ठाकुर यांच्या मालकीची होती. वादमिळकत 'ब' वर आजही नागु यांचेच नाव महसूल सदरी आहे. वादमिळकत ग्रामपंचायत घर क्र. ७२३अ यामध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ राहतात तर, घर क्र. ७१५अ मध्ये कोणीही राहत नाहीत. साक्षीदार व प्रतिवादी वेगवेगळे राहतात. मात्र त्यांच्यात आजतागायत सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. कै. नागु यांनी वादमिळकतीचे कोणतेही मृत्यपत्र अथवा व्यवस्थापन पत्र केलेले नाही. वादमिळकत स.नं. ५८/१ ही प्रतिवादी क्र. २ व ३ कसत असून वादमिळकत स.नं. ७१/२ब/१ ही खारे पाणी घुसल्याने पडजमिन आहे. त्यांना वादमिकतीचे वाटप करुन स्वतःचा विभक्त हिस्सा हवा आहे. त्यांनी प्रतिवादी यांना दि. १३.११.२०१७ रोजी नोटीस दिली. मात्र प्रतिवादी यांनी त्यास उत्तर दिले नाही अथवा कोणताही प्रतिसाद दिला नाही.

११. सदर साक्षीदाराचा केवळ प्रतिवादी क्र. १ तर्फे उलटतपास घेण्यात आला. इतर प्रतिवादी यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही. सदर साक्षीदाराच्या उलटतपासादरम्यान त्यांनी वादमिळकतीचे वाटप झाले नसल्याचे मान्य केले.

१२. याव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१३. प्रतिवादी तर्फे सा.क्र. १ म्हणून स्वतः प्रतिवादी क्र. १ यांची साक्ष नि.क्र. ३२ कडे नोंदविण्यात आली.

१४. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान वादी यांच्या कथनास पुरक साक्ष दिली. त्यांचा औपचारीक उलटतपास घेण्यात आला. इतर प्रतिवादी यांनी कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आणला नाही. या व्यतिरिक्त प्रतिवादीने इतर कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**युक्तीवाद –**

१५. प्रतिवादी क्र. १ यांचेतर्फे वि. विधिज्ञ श्री. एस. एस. कटके यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांचा दावा प्रतिवादी क्र. १ व ८ यांनी मान्य केला आहे. सबब, मागणी केल्याप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

१६. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्यातर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही.

१७. वादी यांनी त्यांच्या युक्तीवादादरम्यान कथने वाचून दाखविली. वादी यांच्यातर्फे वि. विधीज्ञ श्री. पी. डी. मोकल यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वादमिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही हे सिध्द झाले आहे. वादी, प्रतिवादी क्र. १ व ८ तसेच मयत कृष्णा यांचा वादमिळकतीत प्रत्येकी १/४ हिस्सा आहे. सदर हिस्सा वाटप करुन मिळण्यास वादी व प्रतिवादी पात्र आहेत. सबब,

त्यांनी दावा मंजूर करण्याची विनंती केली.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता</u> –**

१८. मुद्दा क्र. १ हा वादमिळतीत वादी यांची एकत्रीत कुटूंबाची वडीलोपार्जीत मिळकत असल्याबाबत तर, मुद्दा क्र. २ व ३ हे वादी व प्रतिवादी यांच्या वादमिळकतीतील हिश्याबाबत आहे. सदर तीनही मुद्दे ऐकमेकांशी संलग्न असून त्यांची कारणेमिमांसा बऱ्याच अंशी सारखी असल्याने मी तीनही मुद्दे एकत्रितपणे चर्चेसाठी घेत आहे.

१९. निशाणी क्रमांक २२ वरील मुद्दयांचा विचार करता सदर तीनही मुद्दे सिध्द करण्याची जबाबदारी वादी यांच्यावर आहे. वादमिळकतीचे वाटप मागण्यासाठी वादमिळकतीत वादी व प्रतिवीदी यांच्या एकत्र कुटूंबाची अविभक्त मिळकत असल्याचे वादी यांनी सिध्द करणे गरजेचे आहे. हिंदू एकत्र कुटूंब पध्दतीचा विचार करता मुळ पुरुष (*Prepositus*) व मुळ पुरुषापासून खाली चौथ्या पिढीपर्यंत नाते सांगणाऱ्या व्यक्ती यांना कोपार्सनर (Coparcener) असे संबोधले जाते. कोपार्सनरी (Coparcenery) हा हिंदू अविभक्त कुटूंबाचा गाभा आहे. अशा कुटूंबाच्या मिळकतीमध्ये वाटप मागण्याचा अधिकार हा केवळ कोपार्सनर यासच असतो. प्रस्तुत दाव्यात वादी व प्रतिवादी यांचे मुळ पुरुष एक असून उभय पक्षकार एका कोपार्सनरीचे भाग आहेत हे वादी यांनी सिध्द करणे गरजेचे आहे.

२०. वादी व प्रतिवादी यांनी त्याचे नातेसंबंध मान्य केले आहेत. तसेच

वादमिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंबाची मिळकत आहे हेसुध्दा मान्य केलेले आहे. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी असा बचाव घेतला आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये याआधीच वाटण्या झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी त्यांच्या कथनापृष्ठयर्थ कोणीही साक्षीदार तपासलेला नाही. वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान मौखीक वाटप झाल्याचे त्यांचे कथन आहे. मात्र, सदर मौखीक वाटप कधी व कोठे झाले याबाबत सविस्तर विवेचन सदर प्रतिवादी यांनी केलेले नाही. सदर मौखीक वाटपास कोण साक्षीदार होते याचा कोणताही उल्लेख सदर प्रतिवादी यांनी केलेला नाही. सदर प्रतिवादी यांचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र ८ हे सदर मौखीक वाटपाचे भाग होते मात्र, प्रतिवादी क्र. १ व ८ ती बाब स्पष्टपणे नाकारत आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी वादमिळकतीतील हिस्सा सोडून दिल्याबाबत प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी केलेल्या कथनात कोणतेही तथ्य आढळून येत नाही. प्रतिवादी क्र. ८ यांनी लग्नावेळी वादमिळकतीतील हिस्सा सोडून दिला आहे याबाबतही अभिलेखावर कोणताही साक्षीपुरावा नाही. वादी यांना वादमिळकतीतील ठराविक हिस्सा मिळालेला आहे ही बाबही सिध्द करण्यात प्रतिवादी अपयशी ठरले आहेत. याबाबत प्रस्थापित कायद्याचा विचार करता मुल्ला ऑन हिंदू लॉ, लेक्झीसनेक्सीस प्रकाशन, २१ वी आवृत्ती या पुस्तकाच्या परिच्छेद ३२६ मध्ये हिंदू अविभक्त कुटूंबाच्या मिळकतींच्या वाटपाचा पुरावा याबाबत उहापोह केला आहे. त्यामध्ये पाच शक्यता दिल्या आहेत. त्यापैकी पहिल्या शक्यतेमध्ये वाटपाचा स्पष्ट पुरावा, दुसऱ्या शक्यतेत वाटपाबाबत लिखीत दस्त असणे, तिसऱ्या शक्यतेत वाटपाचा लिखीत दस्त असतानाही पक्षकारांचा वाटपाचा हेतू स्पष्टपणे दिसून न येणे, चौथ्या शक्यतेत वाटपाबाबत कोणताही लिखीत पुरावा नसणे तर पाचव्या शक्यतेत

एखाद्या वारसाने विभक्त हिस्सा मिळाल्याचे मान्य करुन त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण न देणे या पाच शक्यता सांगितल्या आहेत. प्रस्तुत प्रकरण त्यापैकी चौथ्या शक्यतेत अंतर्भुत होते. त्याबाबत खालीलप्रमाणे विवेचन केलेले आहे.

> *4. The last case is kind dealt with by the Privy Council in Ganesh Dutt v. Jewach, a case where there was no writing at all. In such a case when the question arises as to whether there has been a partition or not, the intention of the parties as to separation can only be inferred from their acts. The question is one of fact to be decided with due regard to the cumulative effect of all the facts and circumstances, and primarily the burden of showing that there has been a partition is on the person setting it up.*

२१. सदर प्रस्थापित कायद्याचा विचार करता वादमिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप झाले आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्यावर होती. मात्र, मी वर नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. २ ते ७ ते सिध्द करण्यात अपयशी ठरले आहेत. त्यामुळे वादमिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्रीत कुटूंबाची अविभाज्य मिळकत आहे असा निष्कर्ष निघत आहे. ज्याअर्थी वादमिळकत एकत्रीत कुटूंबाची मिळकत आहे हे सिध्द होत आहे त्याअर्थी सदर मिळकतीचे वाटप सिध्द होईपर्यंत सदर मिळकत एकत्रीत आहे असे गृहितक निघते. सदर गृहितक खोडून काढून वाटप सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र. २ ते ७

यांच्यावर होती. ते त्यात अपयशी ठरले आहेत. वादमिळकतीचे वाटप झाले आहे असे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. उलटपक्षी वादी यांनी वादमिळकत एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याबाबत केलेली कथने व त्याअनुषंगाने अभिलेखावर आलेला पुरावा हे निर्वीवाद राहीलेले आहेत. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी वादमिळकतीचे तोंडी वाटप झाल्याचा घेतलेल्या बचावाध्ये कोणतेही तथ्य आढळून येत नाही. वादमिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्रीत कुटूंबाची मिळकत असल्याचे सिध्द होते. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

२२. वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध उभपक्षांनी मान्य केले आहेत. अशा परिस्थीतीत वादी व प्रतिवादी यांच्या कुटूंबाचे मुळ पुरुष नागु ठाकुर होते हे दिसून येते. सदर नागु ठाकुर यांना वादी, प्रतिवादी क्र. १ व ८ तसेच, मयत कृष्णा ही अपत्ये होती. त्यांची पत्नी नागीबाई मयत असल्याचे उभयपक्ष यांनी मान्य केले आहे. अशा परिस्थीतीत वादी, प्रतिवादी क्र. १ व ८ तसेच मयत कृष्णा यांना वादमिळकतीतील प्रत्येकी १/४ हिस्सा मिळण्यास ते पात्र आहेत. मयत कृष्णा यांच्या १/४ हिश्यामध्ये प्रतिवादी क्र. २ ते ७ यांना समान हिस्सा आहे. सबब, प्रतिवादी क्र. २ ते ७ हे मयत कृष्णा यांच्या १/४ हिश्यापैकी प्रत्येकी १/२४ हिश्यास पात्र आहेत. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करिता</u>–**

२३. मुद्दा क्रमांक ४ हा वादी मागणी केल्याप्रमाणे वाटपास पात्र आहेत का या बाबत आहे. याबाबत प्रतिवादी यांनी संपूर्ण वादमिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ न

केल्याचा बचाव घेतला आहे. मात्र, मौजे निगडे येथील स.नं. ५८ तसेच मयत नागीबाई यांचे दागिने या मिळकती अस्तीत्वात आहेत. तसेच, त्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत हे सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र. २ ते ७ यांची होती. प्रतिवादी सदर जबाबदारी निभावण्यात अपयशी ठरला आहे. अभिलेखावरुन सर्व वादमिळकती दाव्यामध्ये समाविष्ठ केल्याचे दिसून येत आहे. याशिवाय संबंधीत पक्षकार यांना वाटपाने मिळकती देण्यास कोणतीही कायदेशिर अडचण दिसून येत नाही. वादी मागणी केल्याप्रमाणे वाटपास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता</u> –**

२४. सदरचा मुद्दा हा दाव्यातील खर्चाच्या अंमलाबाबतचा आहे. न्यायाचे हे प्रस्थापित तत्व आहे की, प्रकरणातील खर्चाचा अंमल हा ज्याच्या विरोधात प्रकरणाचा निकाल गेला आहे अशा पक्षकारावर ठेवण्यात येतो. ज्याच्या बाजूने प्रकरणाचा निकाल लागला आहे असा पक्षकार सर्वसामान्यपणे दाव्याचा खर्च मिळण्यास पात्र असतो. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्यातर्फे प्रकरणामध्ये युक्तीवादासाठी कोणीही हजर राहीलेले नाही. वादी न्यायालयामध्ये नेमलेल्या तारखांना नियमित हजेरी लावत होते. प्रस्तुत प्रकरणाचा निकाल वादी यांच्या बाजूने लागला आहे. त्यामुळे वादी हे प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्याकडून दाव्याचा खर्च मिळण्यास पात्र आहेत. त्याअनुषंगाने मी मुद्दा क्रमांक ५ चे उत्तर नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ६ करीता</u> –**

२५. मुद्दा क्रमांक ६ हा प्रकरणातील हुकूमनामा व आदेशाकरीता आहे. मुद्दा क्रमांक १ ते ५ यांचा समग्रपणे विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत

आहे.

## <u>आदेश</u>

१. दावा खालीलप्रमाणे खर्चासहीत मंजूर करण्यात येत आहे.

२. अ. वादी, प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ८ यांना वादमिळकतीमध्ये प्रत्येकी १/४ हिस्सा असल्याचे घोषित करण्यात येते.

ब. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांना वादमिळकतीमध्ये प्रत्येकी १/२४ हिस्सा असल्याचे घोषित करण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी दाव्याचा स्वतःचा खर्च स्वतः सोसावा तसेच, वादी यांचा खर्च प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी वादी यांना द्यावा.

४. येणेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या वादमिळकतीतील हिश्याबाबत प्राथमिक हुकूमनामा तयार करावा.

५. दाव्याच्या परिच्छेद १(अ) मधील नमुद वादमिळकती शेतजमीनी असल्याने त्यांचे मोजमापाने सरस–निरस वाटप करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८ चे कलम ५४ प्रमाणे जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे अंतिम हुकूमनामा करण्याकरीता प्रकरणातील प्राथमिक हुकूमनामा पाठविण्यात यावा.

६. दाव्याच्या परिच्छेद १(ब) मधील नमुद वादमिळकती घर मिळकती असल्याने त्याच्यातील वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा निर्तुटक करण्याकरीता वि. विधीज्ञ श्री. विशाल पाटील यांची कोर्ट कमिशनर म्हणून खालीलप्रमाणे नेमणुक करण्यात येते.

अ. कोर्ट कमिशनर यांनी प्रत्यक्ष जागी जावून वादमिळकत घर क्र. ७१५अ व ७२३अ येथील जागेचे मोजमाप घेवून हुकूमनाम्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी हिस्सा निर्तुटक करुन द्यावा.

ब. वादी व प्रतिवादी यांनी त्याकामी कोर्ट कमिशनर यांना सहकार्य करावे.

क. कोर्ट कमिशनर यांची फी म्हणून वादी यांनी रक्कम रुपये ५,०००/–(अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) या न्यायालयामध्ये सहाय्यक अधिक्षक, वित्त विभाग पेण यांच्या कार्यालयामध्ये सदर न्यायनिर्णयापासून १४ दिवसांच्या आत जमा करावी.

ड. कोर्ट कमिशनर यांस प्रस्तुत दाव्याची प्रत, हुकूमनाम्याची प्रत, न्यायनिर्णय, गरजेचे नकाशे, गरजेचे महसूली अभिलेख व इतर गरजेची कागदपत्रे वादी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

इ. कोर्ट कमिशनर यांनी वादी व प्रतिवादी यांचे हिस्से निर्तुटक केल्याचा नकाशा तयार करावा व तो न्यायालयामध्ये दाखल करावा.

फ. कोर्ट कमिशनर यांनी कमिशन रिट मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत त्यांच्या कामाची पुर्तता करावी. त्याप्रमाणे अहवाल व नकाशा अभिलेखावर दाखल करावा.

ग. कोर्ट कमिशनर यांनी असा अहवाल व नकाशा दाखल केल्यानंतर त्यांची कमिशन फी रक्कम रुपये ५,०००/– (रक्कम रुपये पाच हजार मात्र) त्यांना अदा करण्यात यावी.

ह. येणेप्रमाणे कमिशन रिट जारी करावे.

खुल्या न्यायालयात घोषित

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DESHPANDE PRITESH CHANDRASHEKHAR
Date: 2022.12.24 14:50:00 +0530

दिनांक १९/१२/२०२२ (प्रितेश देशपांडे)

स्थळः पेण सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर. पेण.

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णय या प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **कनिष्ठ लिपीक** | : | **ओ.एस.पाटील** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर,पेण |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १९.१२.२०२२ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १९.१२.२०२२ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १९.१२.२०२२ |

सही/–
(**ओ.एस.पाटील** )
(कनिष्ठ लिपीक)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, पेण